प्रेसनोट दि ०६/०५/२०९

**"लोकांचे उसने घेतलेले पैसे फेडण्यासाठी प्लॅन करून मित्राचेच ज्वेलर्सचे दुकानात रॉबरीचा बनाव करणा-या दोन आरोपींना युनिट-०४ ने केली अटक"**

फिर्यादी नामे विनोद इंदरमल सोमपुरा,वय-३५ वर्षे,रा.निता कॉर्नर,तिसरा मजला,खडकी,पुणे हे त्यांचे चिंतामणी ज्वेलस,धानोरी या ठिकाणी ग्राहक नामे गौरव जाधव रा.गाडीअड्डा,खडकी यांना आपले सोन्याचे दुकानामधून दि.२८/०५/२०१९ रोजी १२.३० वा.सुमारास एक १० तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र व ०२ तोळे वजनाची सोन्याची चैन असा एकूण - ३,११६५०/- रुपये किंचे १२ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने दाखवित असताना अचानकपणे तोंडाला मास्क लावलेले २० ते २२ वयोगटातील ०३ इसमांनी दुकानात प्रवेश करून ग्राहक नामे गौरव जाधव याचे हातामधून वरील किंमतीचा मुद्देमाल जबरीने चोरून नेलेने वरीलप्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.यातील फिर्यादी विनोद सोमपुरा यांनी प्रसंगावधान दाखवून पळून जाणा-या ३ इसमांपैकी एकाला पकडले,परंतु झालेल्या गर्दी व गोंधळाचा फायदा घेवून त्यास झटका देवून पळून गेला,परंतु त्यांना मोटरसायकलसह पळून जाण्यास शक्य न झाल्याने त्यांची मोटर सायकल जागीच मिळून आली.मिळालेल्या मोटर सायकलचे क्रमांकावरून पोलिसांनी मालकाचा शोध घेतला,मालकाचे जबाबावरून असे समजले की,त्यानी ही मोटर सायकल ही त्यांचे ओळखीचा इसम राम रोकडे रा.गाडी अड्डा खडकी यांना वापरण्यास दिलेली होती.त्यांचे चौकशीवरून अशी माहिती मिळाली की,फिर्यादी यांचे दुकानात ग्राहक म्हणून आलेला इसम गौरव जाधव याने ती गाडी घटना घडले दिवशी २८/०५/२०१८ रोजी वापरणेकरीता घेतली होती,त्यावरून तपासामध्ये असे निष्पन्न झाले की,फिर्यादीचे ओळखीचा इसम गौरव जाधव याने त्याचे साथीदार नामे १.आकाश अरूण रोकडे रा.गाडी अड्डा,खडकी,पुणे व इतर दोन अल्पवयीन मुलांना सोबत घेवून नमूद जबरी चोरी केलेली आहे.

याबाबत विश्रांतवाडी पोलीस स्टेशनचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांचेसह गुन्हे शाखा युनिट-०४ समांतर तपास करीत होती.त्यावेळी पोलीस स्टेशनचे अंमलदार यांनी गौरव जाधव व एका अल्पवयीन साथीदार यास अटक केली,परंतु इतर २ आरोपी मिळून येत नव्हते.

गुन्हे शाखा युनिट -०४ चे पो. हवा ८५१ साळूंके,पो हवा १७४६ मचे,पो कॉ ७४५४ खुणवे,पो कॉ ८२२४ शेलार हे समांतर तपास करीत असताना तांत्रिक विश्लेषणसह स्थानिक पातळीवर माहिती गोळा करीत होते,त्यावेळी त्यांना माहिती मिळाली की,-१.आकाश अरूण रोकडे रा.गाडी अड्डा,खडकी,पुणे व त्याचा अल्पवयीन साथीदार हे रात्री उशिरा किंवा पहाटे घरी येवून गेले व दिनांक-०४/०६/२०१९ रोजी ते जयहिंद टॉकीजजवळ येणार असल्याची माहिती मिळाली,त्यानुसार जयहिंद टॉकीज जवळ,खडकी,पुणे या ठिकाणी त्यांचेवर सापळा रचून त्यांना ताब्यात घेण्यात आले.

गुन्हे शाखेने केलेले तपासामध्ये नमुद गुन्हयातील कटाचा मुख्य सूत्रधार हा गौरव जाधव असून त्याने आपल्या ओळखीचे फिर्यादीकडे सोने खरेदी करतेवेळी त्याचे फोटो काढून व्हाट्सअपद्वारे पाठवून घरच्यांची पसंती घेण्याचे बहाण्याने स्वतःजवळ घेवून त्याचे साथीदारांना इशारा करून त्याचे हातातून सोने खेचून नेण्याचा कट रचला,परंतु फिर्यादीने दाखविलेले प्रसंगावधानाने ते यशस्वी होऊ शकले नाही.आरोपी गौरव जाधव याने अनेक लोकांकडून अय्याशीसाठी उसणे पैसे घेतलेले असून तो कर्जबाजारी असून तो एका नामांकित फायनान्स कंपनीमध्ये रिकव्हरी ऑफीसरमधून काम करीत असताना क्लाएंटचे पैसे कंपनीमध्ये जमा न करता त्याचा परस्पर अपहार केलेबाबत तसेच इतर अनेक लोकांना गुंतवणुकीचे आमिष दाखवून फसवणूक केल्याची माहिती समोर येत आहे.

सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री.अशोक मोराळे सो,पोलीस उपआयुक्त (गुन्हे) श्री.संभाजी कदम सो,सहाय्यक पोलीस आयुक्त(गुन्हे-२) श्री.भानुप्रताप बर्गे सो यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.अंजुम बागवान,पोलीस उपनिरीक्षक श्री.विजय झंजाड पोलीस कर्मचारी गणेश साळूंके,राजू मचे, भालचंद्र बोरकर शंकर पाटील,सचिन ढवळे,राकेश खुणवे, अतुल मेंगे व अशोक शेलार यांनी केलेली आहे.

प्रेसनोट दिनांक - ६/०५/२०१९

## येरवडा परिसरात दुर्मिळ जातीच्या मांडूळ विक्रीस आलेल्या दोघांना अटक

दुर्मिळ जातीचे मांडूळ साप विक्रीसाठी आलेल्या दोन इसमांना युनिट -०४,गुन्हे शाखा,पुणे शहर यांनी अटक केली आहे.

पोलीस शिपाई राकेश खुनवे यांना येरवडा परिसरातील जय जवान नगर येथे मांडूळ विक्री करता काही इसम येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सदर भागात सापळा लावला असता एका काळया रंगाच्या सॅगबॅग मध्ये दोन इसम एकमेकांशी बोलत असताना दिसले. त्यांना आहे त्या परिस्थितीत जागेवरच स्टाफच्या मदतीने ताब्यात घेवून त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी आपले नाव पत्ता **१. प्रशांत देविदास डांगे, वय ४५ वर्षे, रा संभाजीनगर,अष्टविनायक चौक, यवतमाळ २. प्रमोद मानसिंग पवार, वय ३२ रा महात्मा गांधी नगर,टाटा पॉपरहाऊस,पिसवळी, ता कल्याण, जि ठाणे** असे असल्याचे सांगितले. त्यांचेकडे असलेल्या सॅकची पंचासमक्ष झडती घेतली असता, काळया सॅकमध्ये एक दुर्मिळ जातीचे एक जिवंत मांडूळ मिळून आले. त्यांचेकडे सदर मांडूळाबाबत अधिक चौकशी केली असता, आरोपी प्रशांत डांगे हा मुळचा यवतमाळ येथील रहिवासी असून, त्याचे चौकशीमध्ये त्याने अमरावती ग्रामीण परिसरातून सदरचे मांडूळ एका सॅकमध्ये विक्रीकरता आणले होते सदरची विक्री तो प्रमोद मानसिंग पवार याच्या मदतीने पुणे येथील ग्राहकास देणार होते. सदरचे मांडूळ शुभ व भरभराटीचे प्रतिक म्हणून ग्राहक मोठी किंमत देवून विकत घेतात. जिवंत मांडूळ हे पुढील देखभालीकरता राजीव गांधी प्राणी संग्रहालय,कात्रज,पुणे यांचेकडे सुपुर्द करण्यात आले आहे. या जिवंत मांडूळाची बाजारात काही लाखापर्यत किंमत असल्याचे सांगण्यात येत आहे.

सदरची कारवाई ही मा अपर पोलीस आयुक्त श्री अशोक मोराळे, मा पोलीस उप आयुक्त श्री संभाजी कदम, सहा पोलीस आयुक्त श्री भानुप्रताप बर्गे, पोलीस निरीक्षक श्री अंजुम बागवान यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक श्री विजय झंजाड, कर्मचारी श्ंकर पाटील, राकेश खुनवे, गणेश साळुंखे, सचिन ढवळे, रमेश राठोड, सुरेंद्र साबळे, सागर घोरपडे, अशोक शेलार यांनी केली आहे.

दि. ०६/०५/२०१९

# प्रेसनोट

मा. पोलीस आयुक्त साो,पुणे शहर यांनी कोर्ट कामकाजाबाबत अजामीनपात्र वॉरंटची सक्त बजावणी करणेबाबत आदेशित केले असून, गुन्हे शाखा समांतर बजावणी करीत असते. चंदननगर पोलीस स्टेशन हददीतील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी शिवाजीनगर न्यायालय क्र ५,पुणे येथील अटक वॉरंट अर्ज क्र. ३९७६/१५ मधील आरोपी योगेश बंडोपंत ढमढेरे रा गणेशनगर, वडगाव शेरी,पुणे हा सन २०१५ हा पासून फरार होता. आज रोजी युनिट -०४, गुन्हे शाखा,पुणे येथील पोलीस कर्मचारी सुरेंद्र साबळे यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, योगेश ढमढेरे हा चंदननगर बायपाय येथे एका हॉटेल जवळ उभा असल्याचे खात्रीशिर माहिती मिळाली. त्याप्रमाणे पोलीस कर्मचारी अब्बुल करीम सय्यद, राजेश खुनवे, अशोक शेलार, असे बातमीच्या ठिकाणी जावून बातमीप्रमाणे उभ्या असलेल्या इसमास ताब्यात घेवून त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता,त्याने आपले नाव योगेश बंडोपंत ढमढेरे, वय ३४ वर्षे, रा गणेशनगर, वडगाव शेरी,पुणे असे असल्याचे सांगितले. सदर इसमास चंदननगर पोलीस स्टेशनकडे पुढील कार्यवाहीकरता ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही पोलीस निरीक्षक श्री अंजुम बागवान यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक श्री विजय झंजाड, सुरेंद्र साबळे, अब्दुल करीम सय्यद अशोक शेलार यांनी केली आहे.